अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

स्वायत्त

## मराठी विभाग

वर्ग - एफ.वाय.बी.कॉम मराठी

विषय - ग्रामीण साहित्य

विषय कोड - COMMAR1107B

सत्र - १

# प्रश्नसंच

---

**प्र.१) बहुपर्यायी प्रश्न**

१. डॉ. श्रीराम लागू यांनी वैद्यकीय क्षेत्रातील कोणती पदवी घेतली?

अ) बी.ए.एम.एस. ब) बी.एच.एम.एस. क) बी.डी.एस. ड) एम.बी.बी.एस.

२. 'ए मेरे वतन के लोगो' हे गीत कोणी गायले ?

अ) आशा भोसले ब) सुमन कल्याणपूरकर क) लता मंगेशकर ड) अनुराधा पौडवाल

३. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठाचे पहिले कुलगुरू कोण होते?

अ) डॉ. रघुनाथ माशेलकर ब) डॉ. राम ताकवले क) डॉ. विजय भटकर ड) डॉ. नरेंद्र जाधव

४. ''आजच्या तरूण पिढीने भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र याचा अभ्यास करून शास्त्रज्ञ व्हावे'' असा तरूणांना कोणी संदेश दिला?

अ) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम ब) डॉ. रघुनाथ माशेलकर

क) डॉ. विजय भटकर ड) डॉ. राम ताकवले

५. 'प्रख्यात धन्वतरी' म्हणून कोणास ओळखले जाते?

अ) डॉ. ह. वि. सरदेसाई ब) डॉ. श्रीराम लागू क) डॉ. राम ताकवले ड) यापैकी नाही

६. डॉ. श्रीराम लागू यांनी अप्पा बेलवनकरांची भूमिका कोणत्या नाटकात केली?

अ) इथे ओशाळला मृत्यू ब) नटसम्राट क) रायगडाला जेव्हा जाग येते ड) कमला

७. लिपिकाने केलेल्या कार्यालयीन संस्कारास म्हणतात?

अ) टिप्पणी लेखन ब) इतिवृत्त लेखन क) घोषणा पत्र ड) अहवाल लेखन

८. घडलेल्या घटनांचे वृत्तांत लेखन म्हणजे ....... होय.

अ) इतिवृत्त लेखन ब) टिप्पणी लेखन क) माहिती पत्रक ड) घोषणापत्र

९. एखाद्या विचाराचे मर्म किंवा आशय नेमकया शब्दात मांडणे यास काय म्हणतात?

अ) सारांश लेखन ब) इतिवृत्त लेखन क) जाहीर निवेदन ड) घोषणापत्र

१०. लेखी किंवा तोंडी निवेदनास काय म्हणतात?

अ) घोषणापत्र ब) निविदा क) नोंदी ड) अर्ज

११. समाज आणि कुटुंब व्यवस्था कशी असावी या संदर्भातील 'पंचशील' कोणी सांगितली?

अ) डॉ. रघुनाथ मार्शेलकर ब) डॉ. श्रीराम लागू क) डॉ. राम ताकवले ड) डॉ. रमेश भटकर

१२. 'घरोघरी ज्ञानेश्वर जन्मती' या बालसंगोपनाच्या विषयमालावरील लेखमाला कोणी सुरू केली ?

अ) राम ताकवले ब) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम क) डॉ.रघुनाथ माशेलकर ड) डॉ. ह.वि.सरदेसाई

१३. परम महासंगणकाचे जनक कोण?

अ) डॉ. विजय भटकर ब) विजय पाटकर क) डॉ.रघुनाथ माशेलकर ड) डॉ. विक्रम साराभाई

१४. डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी सर्व प्रथम आपली वैद्यकीय सेवा कोणत्या शहरात सुरू केली?

अ) नाशिक ब) पुणे क) सांगली ड) सातारा

१५. लता मंगेशकर यांना कोणत्या टोपन नावाने ओळखले जाते?

अ) लताताई ब) लतादिदी क) लताबाई ड) यापैकी नाही

१६. ''सर्वसामान्य लोक भित्रे आणि स्वार्थी असतात त्यामुळे ते परमेश्वर नावाच्या संकल्पनेला घट्ट धरून बसतात'' हा विचार कोणी मांडला.

अ) डॉ. ह. वि. सरदेसाई ब) डॉ. श्रीराम लागू क) डॉ. रमेश भटकर ड) डॉ. विजय भटकर

१७. 'यशोगाथा' या पाटयपुस्तकाचे लेखक कोण आहेत?

अ) डॉ. श्रीराम लागू ब) डॉ. ह. वि. सरदेसाई क) डॉ. प्र.चि.शेजवलकर ड) डॉ.रघुनाथ माशेलकर

१८. लता मंगेशकर यांनी कोणत्या मराठी चित्रपटात पहिले गाणे गायिले?

अ) किती हसाल ब) पिंजरा क) श्यामची आई ड) साधी माणसं

१९. डॉ. राम ताकवले कोणत्या टोपण नावाने ओळखले जातात?

अ) राम ब) रामभाऊ क) रामकाका ड) राम तात्या

२०. 'कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग' ही संस्था कोणत्या देशात आहे?

अ) भारत ब) पाकिस्तान क) इंग्लड ड) कॅनडा

**प्र.२) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. कोणते तीन चित्रपट डॉ. श्रीराम लागू यांच्या उत्कृष्ट अभियनामुळे गाजले?

२. लता मंगेशकर यांनी गायिलेली कोणती भजने लोकप्रिय ठरली?

३. डॉ. राम ताकवले यांनी कोणकोणत्या विद्यापीठाचे कुलगुरू पद भूषविले?

४. डॉ. रघुनाथ माशेलकरांना कोणकोणते पुरस्कार मिळाले?

५. डॉ. श्रीराम लागू यांनी भूमिका केलेल्या कोणत्याही तीन नाटकाची नावे लिहा?

६. लता मंगेशकर यांनी शास्त्रोक्त संगीताचे धडे कोणाच्या मार्गदर्शनाखाली घेतले?

७. महाराष्ट्र सरकारने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कोठे सुरू केले?

८. टिप्पणी म्हणजे काय?

९. इतिवृत्त लेखन म्हणजे काय?

१०. अभिनय सम्राट म्हणून कोणास ओळखले जाते?

११. 'यशोगाथा' या पाठयपुस्तकात कोणाच्या यशोगाथा समाविष्ठ आहेत?

१२. 'यशोगाथा' या पाठयपुस्तकात चित्रपट क्षेत्राशी निगडित लेखांची नावे लिहा?

१३. राष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ म्हणजे कोणास ओळखले जाते?

१४. जाहीर निवेदन म्हणजे काय?

१५. सारांश लेखन म्हणजे काय?

१६. 'यशोगाथा' या पाठयपुस्तकाचे लेखक कोण?

१७. डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी कोणत्या दोन गोष्टींचा उल्लेख आधुनिक क्रांतीचा जनक म्हणून केला आहे?

१८. लता मंगेशकर यांना कोणत्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले?

१९. डॉ. राम ताकवले यांना कोण-कोणत्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले?

२०. डॉ. श्रीराम लागू हे कोणत्या व्याधीवरील तज्ज्ञ होते?

**प्र.३) टिपा लिहा**

१. डॉ. श्रीराम लागू यांचे चित्रपट क्षेत्रातील योगदान.

२. गानतपस्वी लता मंगेशकर

३. डॉ. राम ताकवले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान.

४. डॉ. रघुनाथ माशेलकर यांची 'पंचशील'

५. डॉ. ह. वि. सरदेसाई यांची स्वयंशिस्त

६. डॉ. रघुनाथ माशेलकरांचा युवकांना उपदेश

७. इतिवृत्ताचे स्वरूप

८. सभा आयोजनपूर्व तयारी

९. कार्यक्रमाचे प्रास्ताविक

१०. डॉ. श्रीराम लागू यांचे अंधश्रेध्देविषयी विचार

११. निबंध लेखनाचे महत्त्व

१२. सारांश लेखन

१३. अहवालात्मक टिप्पणी लेखन

१४. घोषणापत्र

१५. कार्यक्रमातील सूत्रसंचालनाचे महत्त्व

१६. माहितीपत्रकाचे महत्त्व

१७. जाहीर निविदा

१८. डॉ. ह. वि. सरदेसाई यांचे वैद्यकीय शिक्षणाबद्दलचे विचार

१९. डॉ. श्रीराम लागू यांची नाटके

२०. अर्ज लेखन करताना घ्यायची काळजी

**प्र.४) लघुत्तरी प्रश्न**

१. डॉ. श्रीराम लागू यांचे चित्रपट क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.

२. डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी भारत आणि इंग्लड मधील वैद्यकीय शिक्षणासंदर्भात कोणते विचार मांडले?

३. तुमच्या महाविद्यालयात स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित केलेले सभेचे इतिवृत्त लिहा.

४. डॉ. श्रीराम लागू यांची समाज प्रबोधनाबद्दलची भूमिका स्पष्ट करा.

५. अक्षता पतसंस्था बारामती यांनी ठेवीदारांसाठी १० टक्के व्याजाची घोषणा केली आहे, या संबंधीचे घोषणापत्र तयार करा.

६. विद्यार्थी ग्राहक भांडारासाठी विविध स्टेशनरी खरेदी करायचे आहे, यासाठी निविदा लेखन करा.

७. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये 'युवा सप्ताहा'चे आयोजन करायचे आहे, या संबंधीचे माहितीपत्रक तयार करा.

८. लता मंगेशकर यांचा गायनाच्या क्षेत्रातील प्रवास सांगा.

९. डॉ. राम ताकवले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.

१०. इंग्लड येथील विद्यापीठाने डॉ. राम कदम यांना एक वर्ष कालावधीसाठी मराठी विषयाच्या अद्यापनासाठी निमंत्रित केले आहे, या संदर्भात त्यांनी केलेल्या अर्जावर कार्यालयीन टिप्पणी लेखन करा.

११. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील ग्रंथालयासाठी अनेकान्त प्रकाशन, पुणे यांच्याकडून एफ.वाय.बी.कॉम. या वर्गाच्या पाठयपुस्तक मागणीसाठी अर्ज करा.

१२. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये रिक्त असलेल्या 'मराठी' विषयाच्या 'सहाय्यक प्राध्यापक' पदासाठी मा. प्राचार्यांच्या नावे अर्ज करा.

१३. प्रगती नगर बारामती विभागातील कचऱ्याच्या संदर्भात बारामती नगरपरिषदेला तक्रार अर्ज करा.

१४. बारामती बेकरी मध्ये काम करणाऱ्या गणेश शिर्के यांना कामावरून कमी केले आहे, यासंबंधी जाहीर निवेदन करा.

१५. डॉ. राम ताकवले यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठात केलेले कार्य स्पष्ट करा.

१६. सारांश लेखनाची आवश्यकता स्पष्ट करा.

१७. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून डॉ. राम ताकवले यांनी केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

१८. डॉ. ह. वि. सरदेसाई यांची रूग्न सेवा कशी केली? ते सांगा.

१९. टिप्पणी लेखनाचा हेतू स्पष्ट करा.

२०. निबंध लेखनाची गरज स्पष्ट करा.

**प्र.५) दिघोत्तरी प्रश्न**

१. 'अभिनय सम्राट' डॉ. श्रीराम लागू यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घ्या.

२. लता मंगेशकरांना 'गानतपस्वी' का म्हणतात?

३. डॉ. राम ताकवले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.

४. डॉ. ह. वि. सरदेसाई यांना 'प्रख्यात धन्वंतरी' असे का म्हणतात?

५. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर ५०० शब्दात निबंध लिहा.

अ) उद्योगव्यवसायातील मराठी माणूस

ब) विज्ञान आणि अंधश्रध्दा

क) सोशल मिडिया आणि आजचा तरूण

ड) वाढती महागाई

ई) ग्राहक संरक्षण चळवळ

इ) रात्र चांदण्याची

उ) काय वाचावे काय वेचावे

ए) नोकरीपेक्षा व्यवसाय बरा

ज) स्वच्छ भारत अभियानात माझी भूमिका

र) निसर्ग माझा सखा

६. सूत्रसंचालनाचे स्वरूप स्पष्ट करा.

७. खालील उत्ताऱ्याचे १/३ सारांश लेखन करून शीर्षक द्या.

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी प्राचीन ग्रामव्यवस्थेचा चांगला अभ्यास केला होता. इंग्रज हिंदुस्थानात येण्याअगोदर हजारो वर्षे येथील ग्रामव्यवस्था चांगली होती. पाटील गावाचा प्रमुख असे. गावपातळीवर पंच कारभार पहायचे. पटवारी, येसकर त्यांना मदत करायचे. सुतार, कुंभार, न्हावी, सोनार, माळी, दोरखंड करणारे लोहार हे ग्रामव्यवस्थेतील कुशल कारागीर होते. इंग्रजांनी ही ग्रामव्यवस्था मोडून काढली. सयाजीरावांनी ठरविले जुने ग्रामव्यवस्थेचे पुररूज्जीवन करायचे, यातून गावपंचायती स्थापना केली. पंचायतीचा सभासद किमान साक्षर असावा असा कायदा केला. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकशाही पंचायत राज्याची सुरूवात केली. (शब्दसंख्या ७६)

८. 'राष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ' म्हणून डॉ. रघुनाथ मार्शेलकर यांच्या कार्याचा आढावा घ्या.

९. 'यशस्वी व्यक्तींच्या जीवनगाथा व्यक्तीला प्रेरक असतात', 'यशोगाथा' पाठयपुस्तकाच्या आधारे स्पष्ट करा.

१०. प्रशासनिक कार्यालयामध्ये व्यावहारीक मराठीची आवश्यकता आहे, स्पष्ट करा.

११. सारांश लेखन एक भाषिक कौशल्य आहे, स्पष्ट करा.

१२. निबंध लेखन म्हणजे काय? निबंध लेखनाचे विविध प्रकार सांगा.

१३. आजची भारतीय शिक्षण व्यवस्था यावर विचार लिहा.

१४. नाटक व चित्रपट क्षेत्राशी निगडित तुमच्या आवडत्या अभिनेत्यांविषयी माहिती सांगा.

१५. एक उदारमतवादी व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. राम ताकवले यांचा परिचय करून द्या.

१६. डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी वैद्यकीय क्षेत्रासंदर्भात मांडलेले विचार महत्त्वपूर्ण आहेत, स्पष्ट करा.

१७. टिप्पणी लेखनाचे महत्त्व सांगून कार्यालयीन कामकाजाची पध्दत स्पष्ट करा.

१८. बारामती सहकारी बँकेची सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली आहे. त्यासंदर्भात सभेचे इतिवृत्त तयार करा.

१९. माळेगाव सहकारी साखर कारखाना, माळेगाव ता. बारामती यांच्या वतीने सामुदायिक मोफत विवाह सोहळा आयोजित केला आहे, या विषयी जाहीर निवेदन तयार करा.

२०. वृत्तांतात्मक टिप्पणी लेखनाचे महत्व विशद करून महाविद्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या स्नेहसंमेलन सभेचे इतिवृत्त तयार करा.

-----------------------------------